MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २०२/२००८/ दिनांक :

१) श्री. आप्पासाहेब जगन्नाथ सावंत,
मु.पो. बनाळी, ता. जत, अर्जदार
जिल्हा सांगली.

२) श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, तक्रारदार प्रतिनिधी
मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
ग्रामीण विभाग, सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उपविभागीय कार्यालय, जत,

जि. सांगली

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**कोरम** :– १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

श्री. आप्पासाहेब जगन्नाथ सावंत हे मु.पो. बनाळी, ता. जत, जि. सांगली येथील रहिवाशी आहेत. त्यांनी तेथे घरगुती कारणासाठी वीज जोडणी मिळणे करीता दि. १.२.२००८ रोजी अर्ज दाखल केला. तसेच वि.प.ने दिलेले प्रोसेसिंग फीचे चलन दि. १.२.२००८ रोजी भरले आहे. जोडणी बाबत पुढील कार्यवाही न झालेने अर्जदाराने प्रतिनिधीमार्फत अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली कडे विहित क्ष नमुन्यात तक्रार दाखल केली होती, त्यावर कक्षाने आदेश पत्र क्र. २५७१ दि. ५.४.२००८ ने सदर जोडणी तेथील शेती स्वतंत्र फिडरवर येत असलेमुळे देता येत नाही असा निर्णय दिला. सदर निर्णय मान्य न झालेने तक्रारदार यांनी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळकडे दि. ११.७.२००८ रोजी अ नमुना अर्जात अपील दाखल केले. त्यानुसार मंचाने कार्यवाही सुरु केली. संबंधित वि.प.अधिकाऱ्याकडून मुद्देनिहाय माहितीची मागणी केली व दिनांक ११.८.२००८ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता सुनावणीची तारीख म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, सांगली मंडल कार्यालय या ठिकाणी निश्चित केली.

त्यानुसार सदर सुनावणीवेळी स्वत: तक्रारदार श्री. आप्पासाहेब जगन्नाथ सावंत, त्यांचे प्रतिनिधी श्री. खापरे तर वितरण कंपनीतर्फे श्री. बी.बी. भोसले, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग, तर श्री. बी.टी. पाटील, उप कार्यकारी अभियंता, सांगली मंडल, श्री. जे.एस. बोडके, उप कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग, श्री. जी.बी. उत्पात, सहाय्यक अभियंता जत उप विभाग, श्री. आर.एन. कुलकर्णी, सहाय्यक अभियंता, सांगली (ग्रामीण) विभाग, श्री. एस.के.पाटील, कनिष्ठ अभियंता, सांगली (ग्रा) विभाग इ. हजर होते.

<u>ग्राहकाने तक्रारीचे स्वरुप व म्हणणे खालील प्रमाणे मांडले</u>

श्री. आप्पासाहेब जगन्नाथ सावंत यांनी मु.पो. बनाळी, ता. जत, जि. सांगली येथे घरगुती वीज जोडणी करीता दि. १.२.२००८ रोजी अर्ज केला. वितरण कंपनीने दिलेले प्रोसेसिंग फीचे चलन दि. १.२२००८ रोजी भरले आहे. आयोगाचे मानके प्रमाणे मागणीनंतर १ महिऩ्यात वीज कनेक्शन कार्यवाहीचे बंधन आहे. परंतु वितरण कंपनीकडून कार्यकारी संचालक, मुख्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. १७४४३ दि. १०.४.२००७ नुसार शेती फिडरवर शेती इतर वीज जोडण्या देऊ नयेत व गावठाण फिडरवर शेती जोडण्या देऊ नयेत असे निर्देश असलेने व मागणी केलेल्या घरगुती जोडणी ठिकाणी शेती फिडर असलेने जोडणी देता येणार नाही असे कळविले.

आयोगाचे कृतीचे मानके नुसार नवीन वीज जोडणीचे मागणीवर अशा परिपत्रकातील अटी लागू राहणार नाहीत. सबब घरगुती वीज जोडणी बाबत कार्यवाही व्हावी अशी मागणी आहे.

वितरण कंपनीने बाजू खालील प्रमाणे मांडली

सदर अर्जदाराची नवीन वीज जोडणी अर्ज दि. १.२.२००८ ला प्राप्त झाला. त्यांना वितरण कंपनी, मुंबई कार्यकारी संचालक पत्र क्र. १७४४३ दि.. १०.४.२००७ नुसार जोडणी ठिकाणी शेती फिडर जात असलेने जोडणी देता येणार नाही असे कळविले होते. दरम्यान शेगाव उप केंद्रातून निघणारा गावठाण फिडरवर शेगाव, बनाळी, अंतराळ गावठा फिडरवर येणार होती/ प्रपोज्ड होती व उर्वरीत फिडर शेती म्हणून केला जाणेचे ठरले होते. सदर फिडरचे अंतराळ गाव पर्यंत काम झाले व दरम्यान सदर फिडरचे काम करीत असलेल्या कंत्राटदरास दिलेली कामाची मर्यादा संपली. त्यामुळे सदर फिडर मिक्स शेती व शेती इतर असा राहिला. या स्थितीचा फायदा घेऊन अर्जदारास जोडणी देणे बाबत पुढील कार्यवाही करणेत येत आहे. अर्जदारास जोडणीची रक्कम भरणेस चलन दि. २५.७.२००८ रोजी दिले. अर्जदाराने सदर रक्कम दि. ७.८.२००८ रोजी भरली. अर्जदाराने घरातील वायरींगचा टेस्ट रिपोर्ट देणे बाकी आहे. तो प्राप्त झालेवर वीज पुरवठा जोडणी देणेच काम करणेत येईल.



सदस्य सचिव ग्रा.त.नि.मं. कोल्हापूर परिमंडळ यांचे मत

ग्राहक व वि.प. यांनी मांडलेली म्हणणे, उपलब्ध कागदपत्रे, पुरावे इ. विचारात घेऊन सदस्य सचिव म्हणून खालील प्रमाणे मत मांडित आहे. विद्युत नियामक आयोग यांनी नवीन वीज जोडणी देणेस काल मर्यादेचे बंध घातलेले आहे. वितरण कंपनीचे मुख्य कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. १७४४३ दि. १०.४.२००७ ने शेती प्रकारचे फिडरवर शेतीवर वीज जोडण्या व गावठाण फिडरवर शेतीपंप जोडण्या देऊ नयेत हे धोरणात्मक कामकाजाचा भाग म्हणून परिपत्रक काढलेले आहे. त्याचा संबंध जोडून नवीन वीज जोडण्या घेण्यापासून ग्राहकांना वंचित ठेवता येणार नाही अन्यथा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे विनियम ०६ मधील कृती मानके नुसार संबंधितांस भरपाई देणे लागू राहिल. तक्रारदाराचे प्रकरणात जोडणीच्या ठिकाणी योगाने मिक्स फिडर असलेने अर्जदारास जोडणीची रक्कम भरणेस चलन देणेत आले व त्याचा भरणा करणेत आला. ग्राहकाने कागदपत्रांची उर्वरीत पूर्तता केलेवर वीज जोडणीची कार्यवाही करणेत यावी.

सदस्य सचिव यांच्या मताप्रमाणे सदर तक्रार प्रकरणाचा आदेश खालील प्रमाणे होणेस विनंती आहे.

## आदेश

१) ग्राहकास घरगूती वीज जोडणी देणे बाबतची कार्यवाही वितरण कंपनीकडून करणे सुरु आहे. ग्राहकाकडून अर्ज पूर्ण झालेवर वीज जोडणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग कृती मानके नुसार मुदतीत करावा.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी करणेत यावी व ती केलेची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल कलम ८.७ च्या तरतुदीनुसार मंचास कळविण्यात यावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस आदेशाचे तारखेनंतर ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल केशवा बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व, मुंबई यांजकडे करता येईल.

**( एस.आर. बांबळे )**
**सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच,**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २०२/२००८/ दिनांक :

१) श्री. आप्पासाहेब जगन्नाथ सावंत,
मु.पो. बनाळी, ता. जत, अर्जदार
जिल्हा सांगली.

२) श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, तक्रारदार प्रतिनिधी
मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
ग्रामीण विभाग, सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उपविभागीय कार्यालय, जत,
जि. सांगली

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**<u>कोरम</u> :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
४ श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

श्री. आप्पासाहेब जगन्नाथ सावंत, मु.पो. बनाळी, ता.जत आपले शेतात शेती पंपासाठी ३ एपीसाठी व शेतघरात घरगुती कारणासाठी वीज जोडणी मिळावी म्हणून दोन वेगवेगळे मागणी अर्ज दि. १.२.२००८ रोजी

केले.  सर्व कागदपत्रांची छाननी करुन अर्ज दाखल करुन घेतले. दोन्ही अर्जांची स्वतंत्र ‘ प्रोसेसिंग फी ‘ भरुन घेतली पैंकी शेतीपंपाच्या अर्जाचे चलन दि. ८.३२००८ रोजी दिले व शेतीपंपाच्या लाईनवर म्हणजेच अे.जी. फिडरवर ‘ घरगुती जोडणी ‘ कंपनीच्या धोरणानुसार देता येणार नाही सअे कंपनीने सांगितल्यामुळे शेतीपंपाच्या अर्ज मंजुरीस झालेल्या विलंबाबद्दल व घरगुती जोडणी मंजूर होवून दोन्हीही अर्जाबाबत झोल्या विलंबाबद्दल एस.ओ.पी. प्रमाणे दंडात्मक कारवाई व्हावी  अशी तक्रार मागणी क्ष फॉर्मद्वारे दिनांक ५.२.२००८ रोजी नोंदविली.  त्याचा निर्णय आदेश क्र. २५७१ दि. ५.४२००८ रोजी झाला.  सदरचा आदेश मान्य न झाल्याने प्रथमत: प्रतिनिधी मार्फत व नंतर अर्जदार व प्रतिनिधी मार्फत अ फॉर्ममध्ये अपील दाखल केले आहे.

त्याकामी सुनावणी घेण्यात आली.  सुनावणीस ग्राहक प्रतिनिधी व १ ते ३ वि.प. उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी केलेली कथने, उभयतांनी हजर केलेली कागदपत्रें, मुळ तक्रार अर्ज याचा एकत्रित विचार करता तक्रारीचे स्वरुप सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे आहे.

ग्राहकाचे म्हणणे व मुळ तक्रार

ग्राहकाच्या स्वत:च्या शेतात शेतीपंपासाठी ३ एपी इतका वीज पुरवठा मिळावा.  तसेच शेतातील राहते शेतघरात घरगुती वापरासाठी  ‘ घरगुती जोडणी  ‘ मिळावी.  अशी मुळ मागणी असल्याचे दिसून येते.  सदर मागणीसाठी सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन दि. १.२.२००८ रोजी वि.प.च्या कार्यालयाकडे दोन स्वतंत्र अर्ज दाखल केले आहेत. वि.प.ने कागदपत्रांची छाननी करुन प्रोसेसिंग फीही भरुन घेतली आहे. मात्र विनियमातील तरतुदीप्रमाणे  योग्य कालावधीत जोडणी दिली नाही. त्यामुळे एस.ओ.पी. प्रमाणे दंडात्मक कार्यवाही व्हावी अशी मागणी केली.  वि.प.ने दि. ८.३.२००८ रोजी शेतीसाठीचे कनेक्शनसाठीचे चलन दिले.  मात्र घरगुती जोडणी

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २०२/२००८/ दिनांक :

१) श्री. आप्पासाहेब जगन्नाथ सावंत,
मु.पो. बनाळी, ता. जत, अर्जदार
जिल्हा सांगली.

२) श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, तक्रारदार प्रतिनिधी
मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
ग्रामीण विभाग, सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उपविभागीय कार्यालय, जत,
जि. सांगली

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**<u>कोरम</u> :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,

२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव

५ श्री. जी.सी. लेले, सदस्य

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

श्री. आप्पासाहेब जगन्नाथ सावतं, मु.पो. बनाळी, ता. जत आपले शेतात शेतीपंपासाठी ३ एच.पी.साठी व शेतघरात घरगुती कारणासाठी वीज जोडणी मिळावी म्हणून दोन वेगवेगळे मागणी अर्ज दि. १.२.२००८ रोजी केले. सर्व कादपत्रांची छाननी करुन अर्ज दाखल करुन घेतले. दोन्ही अर्जांची स्वतंत्र ' प्रोसेसींग फी ' भरुन घेतली. पैंकी शेतीपंपाच्या अर्जाचे चलन दि. ८.३.२००८ रोजी दिले व शेतीपंपाच्या लाईनवर म्हणजेच ए.जी. फिडरवर ' घरगुती जोडणी ' कंपनीच्या धोरणानुसार देता येणार नाही असे कंपनीने सांगितल्यामुळे शेतीपंपाच्या अर्ज मंजुरीस झालेल्या विलंबाबद्दल व घरगुती जोडणी मंजूर होवून दोन्हीही अर्जाबाबत झालेल्या विलंबाबद्दल एस.ओ.पी. प्रमाणे दंडात्मक कारवाई व्हावी अशी तक्रार मागणी ' क्ष ' फॉर्मद्वारे दि. ५.२.२००८ रोजी नोंदविली. त्याचा निर्णय आदेश क्र. २५७१ दि. ५.४.२००८ रोजी झाला. सदरचा आदेश मान्य न झाल्याने प्रथमत: प्रतिनिधीमार्फत व नंतर अर्जदार व प्रतिनिधीमार्फत ' अ ' फॉर्ममध्ये अपील दाखल केले आहे.

त्याकामी दि. ११.८.२००८ रोजी दुपारी ५.०० वाजता मंडल कार्यालय, सांगली येथे सुनावणी घेण्यात आली. सुनावणीस ग्राहक, प्रतिनिधी व १ ते ३ वि.प. उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी केलेली कथने, उभयतांनी हजर केलेली कागदपत्रें, मुळ तक्रार अर्ज याचा एकत्रित विचार करता तक्रारीचे स्वरुप सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे आहे.

<u>ग्राहकाचे म्हणणे व मुळ तक्रार</u>

ग्राहकाच्या स्वत:च्या शेतात शेतीपंपासाठी ३ एचपी इतका वीज पुरवठा मिळावा तसेच शेतातील राहते शेतघरात घरगुती वापरासाठी ' घरगुती जोडणी ' मिळावी अशी मुळ मागणी असल्याचे दिसून येते. सदर मागणीसाठी सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन दि. १.२.२००८ रोजी वि.प.च्या कार्यालयाकडे दोन स्वतंत्र अर्ज दाखल केले आहेत. वि.प.ने कागदपत्रांची छाननी करुन प्रोसेसींग फी भरुन घेतली आहे. मात्र विनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य कालावधीत जोडणी दिलेली नाही. त्यामुळे एस.ओ.पी. प्रमाणे दंडात्मक कारवाई व्हावी अशी मागणी केली. वि.प.ने दि. ८.३.२००८ रोजी शेतीच्या कनेक्शनसाठीचे चलन दिले. मात्र घरगुती जोडणी मंजूर केली नाही. हे बेकायदेशीर आह. त्यामुळे मजला दोन्ही अर्जाच्या मंजुरी व जोडणीच्या विलंबाबद्दल दंडात्मक रक्कम वसूल होवून मिळावी अशा स्वरुपाची तक्रार व मागणी आहे.

<u>वि.प. तथा वीज वितरण कंपनीचे म्हणणे</u>

ग्राहकाने अर्ज केल्यावर १ल्या टप्प्यात ' प्रोसेसीग फी ' भरुन घेवून अर्जाची छाननी व जागेची पाहणी केली आहे. शेतीसाठीची जोडणी दि. ८.३.२००८ रोजी मंजूर केले आहे. थोडाच विलंब झाला आहे हे खरे आहे पण तो माफ करावा, त्यास एस.ओ.पी. प्रमाणे करवाई करु नये. तसेच कंपनीच्या धोरणाप्रमाणे ए.जी.

फिडरवर घरगुती जोडणी देता येणार नाही व गावठाण फिडरवरुन कनेक्शन द्यावयाचे झाल्यास त्याचा खर्च ग्राहकाने करावा असे आहे. तथापी या सर्वास विलंब होणार असल्याने ' मिक्स ' फिडरवरुन आम्ही जोडणी देत आहोत. कंपनीच्या धोरणामुळेच चलन देण्यास विलंब झाला आहे. तथापी दि. २५.७.२००८ रोजी चलन दिलेले आहे. सदरचे चलन भरुन कागदपत्रे पूर्ण करुन देताच वीज जोडणी देत असल्याचे वि.प.च्या वतीने सुनावणीच्यावेळी स्पष्ट करण्यात आले. सर्व परिस्थितीचा विचार करुन दोन्हीही जोडणीबाबत एस.ओ.पी. प्रमाणे दंडात्मक कारवाई करुन नये असे म्हणणे वि.प. तर्फे मांडण्यात आले.



सर्वसाधारण सर्व बाजूनी विचार करता माझे मत व निरीक्षण पुढील प्रमाणे आहे.

श्री. सावंत यांचा अर्ज दि. १.२.२००८ रोजी प्राप्त झाल्यावर ( दोन्ही अर्जाच्या कागदपत्रांची) छाननी होवून दोन्ही अर्जाची स्वतंत्र ' प्रोसेसींग फी ' त्याचदिवशी भरुन घेतलेली आहे हे योग्य आहे. मात्रचलन देण्यास विलंब झाला आहे. अर्ज दि. १.२.२००८ रोजी प्राप्त झालेले आहेत. पैंकी शेतीपंपासाठीच्या अर्जाचे चलन दि. ८.३.२००८ रोजी म्हणजे १७ दिवसांचा विलंब झाला आहे. विलंबास समाधानकारक खुलासा मंचापुढे सादर केलेला नाही. तसेच अंतर्गत कक्ष, सांगलीनेही आपल्या निर्णयात एस.ओ.पी. प्रमाणे कारवाई होणेचे नमूद केले आहे. त्यामुळे विलंबासाठी ३ आठवड्याचे प्रति आठवडा रु. १००/- इतकी रक्कम शेतीपंपाच्या अर्ज विलंबाबद्दल द्यावी. तसेच घरगुती जोडणीच्या दुसऱ्या अर्जाच्या जोडणीस ED1/GFSS/17443 dated 10.4.2007 नुसार मंजुरी देता येत नसल्याचे कळविले आहे. हे मजला अयोग्य वाटते. गावठाण फिडर स्वतंत्र उभारणीमध्ये ' शेती फिडरवर ' इतर जोडण्या देवू नयेत हे यंत्रणोच्या दृष्टीने योग्य आहे. तथापी या कारणासाठी ग्राहकाला ' शेतघरात ' ती घरगुती जोडणी नाकारणे चुकीचे आहे. ग्राहक प्रतिनिधीनी त्यासाठी बराच पत्र-व्यवहाराचा व आयोगापुढे म्हणणे मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत आहे. अर्जात ' कांही त्रुटी ' असल्यास ग्राहकास व प्रतिनिधीस कळवून त्याची पूर्तता करुन ' तक्रारअर्ज ' दाखल करुन घेणे योग्य आहे. तो फेटाळणे हे ' नैंसर्गिक न्यायाच्या ' विपरीत आहे. त्यामुळे ग्राहक व प्रतिनिधीचा अर्ज मांडणी व मागणी करतांना गोंधळ झालेला दिसून येतो. त्यामुळे दि. ३.६.२००८ चा अर्ज व दि. ८.७.२००८ चा अर्ज यांचा एकत्रित विचार करुनच निर्णय होणे न्यायीक वाटते. कंपनीने प्रथमत: दि. १०.४.२००७ च्या पत्रातील आपली भूमिका बदलून ' ठेकेदराचे काम संपले ' अशा पध्दतीचे म्हणणे सांगून मिक्स फिडरची योजना पुढे आणलेली दिसते. खरे पाहता ' गावठाण फिडरवरुनच ' लाईनची उभारणी वि.प.ने करणे व जोडणी देणे हे विद्युत अधिनियम २००३ व विनियम तरतुदी व आयोगाचे आदेश या प्रमाणे योग्य होते. तसे न करता ' मिक्स फिडरची ' नवीन संकल्पना पुढे आणून विलंबाने वि.प.ने दि. २५.७.२००८ रोजी उशिरा चलन दिले आहे. त्यामुळे अर्ज दाखल दि.१.२.२००८ च्या पुढे २० दिवसांत खर्चाचे चलन देणे योग्य होते. परंतु तसे न केल्यामुळे दि. २१.२.२००८ पासून दिनांक २५.७.२००८ पर्यंत प्रति आठवड्यास रु.१००/- प्रमाणे २३ आठवड्यांचे

रु २३००/– एस.ओ.पी. प्रमाणे ग्राहकास द्यावेत. असेच मिळून अर्ज १चे रु. ३००/– व अर्ज २ चे रु. २३००/– असे एकत्रित रु. २६००/– द्यावेत असे माझे मत आहे. न्याय मिळण्यास विलंब झाला तरी ग्राहक व प्रतिनिधी यांची संघटना यांनी बराच पत्र–व्यवहार व आयोगाकडे म्हणणे सादर केले आहे. त्यामुळे पुढील तक्रारीत याचा संघटनेला उपयोगच होणाच आहे. त्यामुळे खर्च व मानसिक त्रासासाठीचे रु. ५०००/– ची मागणी मंजूर करु नये तसेच अतंर्गत कक्षचा आदेश अंशत: रद्द करणेत यावा असे मत मी मांडत आहे.

**( जी.सी. लेले )**
**ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच,**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २०२/२००८/ दिनांक :

१) श्री. आप्पासाहेब जगन्नाथ सावंत,
मु.पो. बनाळी, ता. जत, अर्जदार
जिल्हा सांगली.

२) श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, तक्रारदार प्रतिनिधी
मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
ग्रामीण विभाग, सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उपविभागीय कार्यालय, जत,
जि. सांगली

विरूध्द पक्षकार

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**कोरम :-** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

**न्याय निर्णय**

**अध्यक्ष श्री. के.वाय. जगताप तर्फे**

कोल्हापूर दिनांक १६.०९.२००८

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

प्रस्तुत अर्जदार हा मु.पो. बनाळी, ता. जत, जि. सांगली येथील रहिवाशी असून तेथे त्यांची शेत जमीन व शेतातील घर आहे. वरील गावातील विद्युत वितरण क रणारी संस्था म्हणजे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ही होय. अशा कंपनीचे कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली हे कार्यरत होत. दिनांक १.२.२००८ रोजी तक्रारदाराने वितरण कंपनीचे जत उप विभागाकडे घरगुती नवीन वीज पुरवठा मिळणेसाठी अर्ज केला. तसेच त्याच दिवशी त्या अर्जाबाबतची प्रोसेसिंग फी देखील दि. १.२.२००८ रोजी वितरण कंपनीकडे भरण्यात आली. पुढे दि. ५.२.२००८ रोजी वरील तक्रारदाराने क्ष नमुन्यामध्ये अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे विद्युत पुरवठा न मिळाले बाबत अर्ज दिला. त्यावर त्याना कळविण्यात आले की, सदरचे घरगुती वीज कनेक्शन शेती पंप वाहिनीवर येत असलेने असा वीज पुरवठा मंजूर करता येत नाही. वरील प्रमाणे आदेश हा दि. ५.४.२००८ रोजी सांगली कक्षाने कळविला आहे.

पुढे अर्जदाराने जत तालुका विद्युत धारक असोसिएशनचे मार्फत मा. राज्य आयोगाकडे दिनांक ६.७.२००८ रोजी याचिका दाखल केली. त्यावर, अशी तक्रार प्रथम ग्रा.त.नि.मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ नुसार दाखल करणे बाबत कळविले. सबब प्रस्तुत अर्जदार तक्रारदाराने दिनांक ८.७.२००८ अशी तारीख असलेला अनुसूची अ नमुन्यातील अर्ज दिनांक ११.७२००८ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला व नोंदविण्यात आला.

वरील अर्जाबाबत वितरण कंपनीकडे म्हणजेच वि.प.कडून म्हणणे मागविण्यात आले. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली यांचेकडे दिनांक १२.८.२००८ रोजी म्हणणे असेले पत्र प्राप्त झाले. त्यामध्ये महावितरण मुख्य कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. १७४४३ दिनांक १०.४.२००७ नुसार तक्रारदारास वीज पुरवठा मंजूर केला नव्हता असे कळविले. पुढे गावठाण वाहिनी काम पहिल्या टप्प्यातील प्रस्तावात पूर्ण झाले असल्याने, दुसरा टप्पा प्रस्तावित होता. परंतु असा दुसरा प्रस्ताव पूर्ण न झालेने या दुसऱ्या टप्प्यातील वाहिन्या ह्या मिक्स्ड फिडर म्हणून कार्यरत करुन पूर्वी प्रमाणेच घरगुती वीज पुरवठा मंजुरीचे धोरण राहिल्याने अर्जदार श्री. सावंत यांस वीज पुरवठा मंजूर करुन दि. २५.७.२००८ रोजी पैंसे भरण्यासाठी चलन देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

वरील प्रमाणे दि. २५.७.२००८ रोजी अर्जदाराची घरगुती वीज पुरवठा करण्याची मागणी मान्य झालेली आहे. मात्र प्रस्तुत तक्रार अर्ज हा दिनांक ११.७.२००८ रोजी अर्जदाराकडून या मंचाकडे दाखल केलेला आहे. अर्जामध्ये कलम ८ मध्ये मंचाकडून अपेक्षित मदतीचे स्वरुप दिलेले आहे. त्यामध्ये १ ते ४ मुद्दयांचा उल्लेख आहे. मात्र त्यापैंकी कोणत्याही मुद्दयामध्ये या मंचाकडून काही मागणी केलेली नाही. या उलट, त्यामध्ये निर्देशित केलेल्या बाबींबाबत अर्जदारास दि. २५.७.२००८ रोजी वितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा मंजूर करुन त्याच्या तक्रारीचे निवारण केलेले आहे.

या बाबत अर्जदार व वि.प. यांचे सुनावणीसाठी सदर प्रकरण सांगली मंडल कार्यालय येथे दि. ११.८.२००८ रोजी नेमण्यात आले. त्यावेळी अर्जदार व त्यांचे प्रतिनिधी श्री. खापरे तसेच ग्राहक संस्थेचे अध्यक्ष श्री. विलासराव जगताप हेही हजर होते. वि.प.तर्फे श्री. बी.बी. भोसले, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग, श्री. बी.टी. पाटील, उप कार्यकारी अभियंता, सांगली मंडल, श्री. जे.एस. बोडके, उप कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग, श्री. जी.बी. उत्पात, सहाय्यक अभियंता जत उप विभाग, श्री. आर.एन. कुलकर्णी, सहाय्यक अभियंता, सांगली (ग्रामीण) विभाग, श्री. एस.के.पाटील, कनिष्ठ अभियंता, सांगली (ग्रा) विभाग इ. हजर होते. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे आमच्या समोर आलेल्या कागदपत्रांच्या संदर्भात तसेच महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने दिलेल्या कृती मानके बाबत ऐकले.

आमच्या समोर केलेल्या युक्तिवादामध्ये अर्जदारातर्फे श्री. खापरे यांचे म्हणणे की, शेती वीज वाहिनीवरुन घरगुती वीज पुरवठा नाकारणे हा आयोगाच्या आदेशाचा भंग आहे. तेच आयोगाच्या कृती मानके प्रमाणे वीज पुरवठा मंजूर केला नाही व दिला नाही हाही आयोगाने दिलेल्या मानकेंचा भंग आहे. तसेच दिनांक १०.४.२००७ रोजीचे महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडील परिपत्रक क्र. १७४४३ व त्यामधील आदेश

ही त्यांची अंतर्गत बाब आहे. सबब, त्या आधारे ग्राहकाला वीज पुरवठा नाकारता येणार नाही.

या उलट, वितरण कंपनीतर्फे म्हणणे की, शेती विद्युत वाहिनी व गावठाण विद्युत वाहिनी यांचे विभागीकरण करणे बाबत योजना अवलंबिलेली आहे व कांही ठिकाणी त्याची अंमलबजावणी व्हावयाची आहे. पुढे तक्रारदारा बाबत, विद्युत पुरवठा करणेसाठीची नियोजित गावठाण वाहिनीचे काम (२रा टप्पा) पूर्ण होऊ न शकल्याने तक्रारदारास, अस्तित्वात असलेला शेती फिडर हा संयुक्त फिडर ( शेती व गावठाण) गृहीत धरुन त्यास वीज पुरवठा मंजूर करणेत आलेला आहे.

वरील प्रमाणे तक्रारदार यांना सदरील तक्रार अर्ज प्रलंबित असतांना विद्युत पुरवठा मंजूर केला आहे. सबब आमच्यापुढे आलेल्या कागदपत्रांवरुन व दोन्ही बाजूंचे आमच्यापुढे सादर झालेल्या म्हणण्यावरुन, खालील मुद्दे आमच्या निष्कर्षास येतात व त्याची उत्तरे आम्ही खालील प्रमाणे त्या त्या मुद्दयांबाबत देत आहोत.

१) प्रस्तुत अर्ज दाखल करतेवेळी तक्रारदार यांना वीज पुरवठा मंजूर करण्यात आला आहे का ?

उत्तर : नाही

२) दि. १.२.२००८ रोजी तक्रारदार यांनी घरगुती वापरासाठी वीज कनेक्शन मिळणे बाबत केलेल्या अर्जावरुन त्यांना कृती मानके प्रमाणे किती दिवसांमध्ये वीज पुरवठा होणे आवश्यक आहे ?

उत्तर : १ वर्ष

३) तक्रारदार यांचे बाबत कृती मानकेमध्ये दिलेल्या बाबीं संबंधात कोणत्याही प्रकारचा अन्याय झाला आहे काय ?

उत्तर : नाही

४) म.रा.वि.वि. कंपनीने दि. १०.४.२००७ रोजी जी.एफ.एस.एस. या योजने प्रमाणे काढलेल्या परिपत्रका बाबत या मंचाकडे तक्रारदार यांना दाद मागता येते काय ?

उत्तर : नाही

## <u>कारणमिमांसा</u>

प्रस्तुत तक्रार अर्ज या मंचापुढे दिनांक ११.७.२००८ रोजी प्राप्त झाला व पुढे अर्ज प्रलंबित असतांना म्हणजे दिनांक २५.७.२००८ रोजी तक्रारदार अर्जदारास घरगुती वीज पुरवठा मंजूर करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांनी दिलेल्या चलनाप्रमाणे पैंसेही भरलेले आहेत. पुढे अर्जदाराने टेस्ट रिपोर्ट दिल्यानंतर त्याबाबत त्यांना वीज पुरवठा करण्यात येत आहे असेही वि.प.चे म्हणणे आहे. सबब सदर तक्रार अर्ज करतेवेळी वीज पुरवठा मंजूर करण्यात आला नव्हता. मात्र हा अर्ज प्रलंबित असतांना दि २५.७.२००८ पर्यंत वीज पुरवठा मंजूर करण्यात आला व पैंसे भरणे बाबत पत्र दिले आहे. सबब अर्ज सुनवणीचे दिवशी व पुढे वीज पुरवठा मंजूर करणे बाबत अथवा देणे बाबत तक्रार शिल्लक राहिलेली नाही.

प्रथमदर्शनी आम्हास विद्युत पुरवठा मुदतीत मंजूर झाला नाही या मुद्दयासंदर्भात तक्रार अवाजवी दिसून येते कारण कृती मानके प्रमाणे मागणी केल्यानंतर अर्जदार यांना –

१) अस्तित्वात असलेल्या जाळ्यातून जोडणी द्यावयाची असेल तर एक महिन्याची मुदती आहे.
२) वितरण मेन्सचा विस्तार अथवा वाढ करण्यासाठी ३ महिने मुदत आहे.
३) नवीन उपकेंद्र सुरु करण्याची आवश्यकता असल्यास १ वर्ष मुदत आहे.

वरील प्रमाणे त्या त्या परिस्थितीमध्ये विद्युत पुरवठा करणेचा कालावधी दिलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये जी.एफ.एस.एस.या योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे. अशा प्रकारचे दि. १०.४.२००७ रोजी वितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयातून संबंधित मुख्य अभियंता यांना परिपत्रक पाठविले आहे. परिणामी, सदरच्या परिपत्रकाची अंमलबजावणी करणे हे त्या त्या अधिकाऱ्यांचे कर्तव्य होय. शेती फिडर व गावठाण फिडर असे जेव्हा दोन वेगवेगळे फिडर करणे आवश्यक आहे, तेव्हा अर्जदार यांनी त्यांच्या शेत घरासाठी मागितलेले विजेचे कनेक्शन हे त्यांना पुरविणे बाबत त्यांचे घरापर्यंत गावठाण फिडर विद्युत वाहिनीचे जाळे किंवा वितरण मेन्सची आवश्यकता आहे. अशी सोय अर्जदाराच्या शेतापर्यंत नसलेने अर्जदारा बाबतचा विद्युत पुरवठा हा कृति मानकेच्या परिशिष्ट अ मधील पॅरेग्राफ ३ (३) या कक्षामध्ये येतो व तो म्हणजे नवीन उपकेंद्र सुरु करण्याची आवश्यकता, ज्यात एक वर्षाचा कालावधी आहे. अर्थात, परिशिष्ट अ (३) मध्ये नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्या बाबत आवश्यक असलेला कालावधी दिसत नाही. परंतु जेंव्हा परिशिष्ट अ (३) मधील सुरुवातीचे १, २ मध्ये, जेंव्हा अर्जदाराचा विद्युत पुरवठा होवू शकत नाही, तेव्हा कलम ३(३) मध्ये दर्शविलेली मुदत नवीन ट्रान्सफॉर्मर बसविणे बाबत ग्राह्य धरावी लागेल. तसेच कृती मानकेमध्ये अशा संबंधात त्यावेळी कदाचित विचारही झाला नसेल, म्हणून नवीन ट्रान्सफॉर्मर / नवीन उपकेंद्र सुरु करण्याची आवश्यकता दि. १०.४.२००७ चे परिपत्रकाप्रमाणे असल्याने अर्जदार यांना विद्युत पुरवठा करणे बाबत एक वर्षाचा कालवधी गृहीत धरावा लागेल. अर्ज दिलेल्या तारखेपसून अर्जदार यांना १ वर्षाचे आंत विद्युत पुरवठा देणे आवश्यक आहे. हा एक वर्षाचा काळ म्हणजे नवीन गावठाण फिडर अथवा त्याचे जाळे अर्जदाराच्या घरापर्यंत तयार करणेसाठीचा होय. मात्र शेती फिडर हा पुढे संयुक्त ( शेती व गावठाण ) वापरासाठी धरण्यात आला असल्याने अर्जदारास दि. २५.७.२००८ रोजी विद्युत पुरवठा मंजूर केला आहे. त्यामुळे कृति मानके प्रमाणे विलंब झाला असे दिसून येत नाही.

सबब या वरुन आम्हांस अर्जदाराची विद्युत पुरवठा मिळण्यास विलंब झाल्याची तक्रार ग्राह्य वाटत नाही.

वरील प्रमाणे मुद्दा क्र. १ ते ३ मधील कारणमिमांसेचा विचार करता, तक्रार अर्जदार यांचा अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. मात्र वर मुद्दा क्र.४ प्रमाणे आम्ही या ठिकाणी आमची कारणमिमांसा देत आहोत.

म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचे कार्यप्रणालीमध्ये वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांना मुख्य कार्यालयाकडून परिपत्रके काढली जातात. अशी परिपत्रके कंपनीच्या ध्येय धोरणाप्रमाणे तसेच कृति मानकेचे आधारे त्याच्या अंमलबजावणी बाबत काढलेली असतात. मुख्य कार्यालयाकडून आलेली परिपत्रके ही संबंधित विभागातील कार्यालयाने अथवा त्याविभागाच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. असे संबंधित परिपत्रक जे दिनांक १०.४२००७ रोजी जी.एफ.एस.एस. बाबत काढण्यात आले ते परिपत्रक ही अंतर्गत बाब जरी असली तरी त्या परिपत्रकानुसार विद्युत पुरवठा करणे संबंधित अधिकाऱ्यावर बंधनकारक आहे.

अर्थात तक्रार अर्जदारातर्फे त्यांचे प्रतिधिनी श्री. खापरे यांचे निवेदनाप्रमाणे असे परिपत्रक हे ग्राहकाच्या हक्कामध्ये बाधा आणू शकत नाही. परंतु आमचे मत असे आहे की, असे परिपत्रक योग्य अथवा अयोग्य, तसेच ते विद्युत कायदा २००३ अथवा महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेली कृति मानके यांच्या विरोधात आहे,

अशा बाबत जाहीर ठराव करुन मिळणेबाबतचा या मंचापुढे विषय होवू शकत नाही व अशी बाब या मंचाचे अधिकारक्षेत्रामध्ये येत नाही.

फारतर अशा परिपत्रकाची योग्यायोग्यता व कायदेशीरपणा ठरवून मिळणे बाबत अर्जदाराने मा.नियामक आयोग अथवा मा. उच्च न्यायालय यांच्यापुढे कायद्याप्रमाणे आवाहन याचिका करणे क्रमप्राप्त ठरते. एकूण वितरण कंपनीने त्यांच्या ध्येयधोरणांची अंमलबजावणी करण्या बाबतचे परिपत्रका संदर्भात आवाहन या मंचापुढे ग्राहकास देता येणार नाही. सबब अर्जातील मुद्दा क्र. ४ पुढे आमचे उत्तर नकारार्थी नोंदविलेले आहे.

वरील मुद्दा क्र. १ ते ४ चा विचार करता, व त्याची कारणमिमांसा पहाता, सदर तक्रार अर्ज हा फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. परंतु यातील विषयाचा विचार करता, खर्चाबाबत कोणताही आदेश देण्याची आवश्यकता नाही.

सबब खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) अर्जदाराची तक्रार फेटाळण्यात येत आहे.
२) खर्चाबाबत आदेश नाही.
३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १६.०९.२००८

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..